International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.6 July-Aug 2023

# भारतीय राज्यघटनेतील केंद्र - राज्य संबंध
## ( विशेषतः कायदेविषयक आणि प्रशासकीय संबंध.)

रवींद्रसिंघ सपुरे
Research Scholar M. A., NET, SET. People's College, Nanded.
Corresponding Author- रवींद्रसिंघ सपुरे
DOI-10.5281/zenodo.8344524

**पार्श्वभूमी :-**

भारतीय राज्यघटना संघराज्य स्वरूपाची असल्याने केंद्र व राज्य कायदेविषयक, कार्यकारी / प्रशासकीय, वित्तीय अधिकारांची विभागणी करण्यात आली. मात्र न्यायविषयक अधिकारांची विभागणी करण्यात आलेली नाही, कारण घटनेने केंद्रीय तसेच राज्य कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी एकाच एकात्मिक न्यायव्यवस्थेची निर्मिती केली आहे. जरी केंद्र व राज्य सरकारे आपापल्या क्षेत्रात सर्वोच्च असले तरी संघराज्य व्यवस्थेच्या प्रभावी कार्य चालनासाठी त्यांच्यामध्ये महत्तम सुसंवाद व समन्वयाची आवश्यकता आहे. त्यामुळे केंद्र व राज्यामधील संबंधाच्या विविध बाजूंचे नियमन करण्यासाठी घटनेत विस्तृत तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

केंद्र - राज्य संबंधाचा अभ्यास तीन आधारावर केला जातो.

1) कायदेविषयक संबंध
2) प्रशासकीय संबंध / कार्यकारी संबंध
3) वित्तीय संबंध

वरीलपैकी केंद्र व राज्यांमधील कायदेविषयक संबंधाची तरतूद घटनेच्या भाग XI च्या प्रकरण एक मधील कलम 245 ते 255 दरम्यान, तर प्रशासकीय संबंधाची तरतूद भाग XI च्या प्रकरण दोन मधील कलम 256 ते 263 दरम्यान करण्यात आलेली आहे.

**उद्दिष्टे:- ( Objectives)**

1) भारतीय राज्यघटनेतील केंद्र राज्य संबंधाचा आढावा घेणे.
2) केंद्र - राज्य संबंधाची घटनात्मक चौकट तपासणे.

**गृहीतके :- ( Hypothesis)**

1) घटनेने केंद्र राज्य कायदेविषयक संबंधाबाबत केंद्राला झुकते मापदंड दिले.
2) केंद्र राज्य संबंधाबाबत संघराज्य, अधिकारांच्या बाबतीत वरचढ ठरतो.

**संशोधन सामग्री/ पद्धती :- ( Research Methodology)**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या लेखनासाठी संशोधन पद्धतीतील साधनापैकी द्वितीय तथ्य संकलन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे यात संदर्भ ग्रंथ, शोधनिबंध, मासिके, लेख, घटनेतील पुरावे संकेतस्थळावरील लिखाण व इतर संबंधित साहित्याचा उपयोग करण्यात आला आहे.

**कायदेविषयक संबंध : - ( legislative Relations)**

घटनेतील भाग 11 मधील प्रकरण एक मधील कलम 245 ते 255 मध्ये केंद्र राज्य यांच्यामधील कायदेविषयक संबंधाची तरतूद आहे. या व्यतिरिक्त इतर काही कलमे सुद्धा या विषयाशी संबंधित आहेत, कोणत्याही संघराज्य घटनेमध्ये भारतीय घटना सुद्धा केंद्र व राज्यांमध्ये कायदेविषयक अधिकारांची विभागणी करते, ही विभागणी भूप्रदेश व विषय या दोन्ही दृष्टिकोनातून करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे घटनेत राज्यांच्या क्षेत्रात संसदीय कायदे आणि राज्य कायद्यावर केंद्राच्या नियंत्रणाची तरतूद करण्यात आलेली आहे.

यावरून केंद्र राज्य कायदेविषयक संबंधाच्या चार बाजू आहेत.

1) केंद्र व राज्यांच्या कायद्यांचा प्रादेशिक विस्तार
2) कायदेविषयक विषयांची विभागणी
3) राज्य विषयावर कायदे करण्याचा संसदेचा अधिकार
4) राज्य कायद्यावरील केंद्राचे नियंत्रण

**1. केंद्र व राज्यांच्या कायद्यांचा प्रादेशिक विस्तार :-**

कलम 245 नुसार राज्यघटनेने केंद्र व राज्यांना दिलेल्या कायदेविषयक अधिकारांचा प्रादेशिक विस्तार किंवा मर्यादा पुढीलप्रमाणे दिले आहेत.

1) संसद भारताच्या राज्यक्षेत्राच्या सर्व किंवा कोणत्याही भागासाठी कायदे करू शकते भारताच्या राज्यक्षेत्रात घटक राज्य केंद्रशासित प्रदेश व संपादित केलेली किंवा संपादित केल्या जातील अशी अन्य राज्यक्षेत्रे यांचा समावेश होतो.
2) राज्यविधी मंडळ राज्याच्या सर्व किंवा कोणते भागासाठी कायदे करू शकते राज्य विधिमंडळाचे कायदे राज्याच्या बाहेर लागू होणार नाही.
3) केवळ संसद राज्यक्षेत्राबाहेरील कायदे करू शकते त्यामुळे संसदेचे कायदे भारतीय नागरिक व त्यांच्या संपत्तीला जगाच्या कोणत्याही भागात लागू असतील.

**2. कायदेविषयक विषयाची विभागणी :-**

घटनेने कलम 246 अंतर्गत केंद्र व राज्यांमध्ये कायद्याच्या विषयाची विभागणी तीन गटांमध्ये केली आहे. यामध्ये वेळेनुसार व परिस्थितीनुसार दिलेल्या तिन्ही गटात मधील विषयाची संख्या कमी अधिक होत गेलेली आहे.

यामध्ये याचे वर्गीकरण तीन सूची मध्ये करण्यात आलेले आहे.

1) संघ सूची ( मूळ विषय 97 / सध्या 100)
2) राज्य सूची. ( मूळ विषय 66 / सध्या 61)
3) समवर्ती सूची. ( मूळ विषय 47 / सध्या 52)

वरील तिन्ही सूचना मधील सर्व विषयावर केंद्र सरकार कायदे करू शकते. राज्य सरकार हे केवळ राज्य सूची व समवर्ती सूची यामधील विषयावर कायदे करू शकते, परंतु केंद्र व राज्य या दोघांनी एखाद्या समवर्ती किंवा राज्य सूचीवर कायदा केला, तर केंद्र सरकारचा कायदा वरचढ ठरतो. एकंदरीत भारतीय राज्यघटनेनुसार केंद्राने केलेल्या कायद्यांना श्रेष्ठ स्थान प्राप्त होते.

**3. राज्य विषयावर कायदे करण्याचा संसदेचा अधिकार :-**

संसद राज्य सूची मधील विषयावर कोणत्या परिस्थितीत कायदे करू शकते या बाबींवर पुढील मुद्द्याच्या सहारे प्रकाश टाकू.

1) कलम 249 नुसार जर राज्यसभेने हजर असलेल्या सदस्यांच्या बहुमताने असा ठराव पारित केला, की राष्ट्रहितासाठी राज्य सूचीतील विषयावर संसदेने कायदा करावा अशा परिस्थितीत संसद राष्ट्रहितार्थ व लोककल्याणासाठी एखादा कायदा करू शकते.
2) कलम 250 नुसार जर देशात राष्ट्रीय आणीबाणीची घोषणा केली, असेल किंवा राष्ट्रीय आणीबाणी चालू असेल तर संसद राज्य सूचीतील कोणत्याही विषयावर कायदा करू शकते. परंतु अशा कायद्यांचा कालावधी आणीबाणी संपुष्टात आल्यानंतर केवळ सहा महिन्यानंतर पुरताच असतो नंतर ती कायदे संपुष्टात येतात.
3) कलम 252 अन्वये जेव्हा दोन किंवा अधिक राज्यांची विधिमंडळांनी ठराव पास करून संसदेला विनंती केल्यास संसद राज्य सूचीतील एखाद्या विषयावर कायदा करते. परंतु अट अशी की ज्या राज्यातील विधिमंडळांनी राज्य सूचीवर कायदा करण्यासाठी विनंती केली, त्याच राज्यांमध्ये त्या कायद्याची अंमलबजावणी होते तो कायदा पूर्ण भारतातील राज्यांना लागू होत नाही.
4) कलम 253 नुसार संसद आंतरराष्ट्रीय कराराच्या अंमलबजावणीसाठी राज्य सूचीतील कोणत्याही विषयावर कायदे करू शकते. या तरतुदीमुळे केंद्र सरकार आपल्या आंतरराष्ट्रीय जबाबदाऱ्या पूर्ण करू शकते.

**4. राज्य कायद्यावरील केंद्राचे नियंत्रण :-**

वरील प्रकारच्या तरतुदी व्यक्ति रीत घटनेने केंद्राला राज्यांच्या कार्यकारी अधिकाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्याचे इतर अधिकार दिलेले आहेत त्यात प्रामुख्याने

राज्यपाल राज्य विधिमंडळाने पारित केलेली काही प्रकारची विद्यके राष्ट्रपतीच्या विचारार्थ राखून ठेवू शकतात राष्ट्रपतींना अशा विधेयकाबाबत पूर्ण नकाराधिकार प्राप्त होतो.

- राज्य सूचीतील काही विषयांशी संबंधित विधेयके राज्य विधिमंडळामध्ये केवळ राष्ट्रपतीच्या पूर्वसंमतीनेच मानता येतात उदाहरणार्थ वाणिज्य कर इत्यादी.
- विकी आणीबाणी दरम्यान राष्ट्रपती राज्यांना निर्देशन देऊ शकते की धनविधेयके आणि इतर वित्तीय विधेयके त्यांच्या विचारात राखून ठेवली जावी.

**2. प्रशासकीय / कार्यकारी संबंध :- (Administrative Relations)**

भाग XI मधील प्रकरण दोन मधील कलम 256 ते 263 दरम्यान केंद्र व राज्य यामधील प्रशासकीय संबंधाच्या तरतुदी देण्यात आले आहेत.

पुढील मुद्द्यांच्या आधारे केंद्र व राज्य प्रशासकीय संबंध आपल्या विवेचनात येतील.

1) केंद्राचे राज्यांना निर्देश.
2) परस्परांना कार्यकारी अधिकार प्रदान करणे
3) केंद्र व राज्यांमध्ये सहकार्य
4) अखिल भारतीय सेवा
5) लोकसेवा आयोग
6) आणीबाणी दरम्यानचे संबंध
7) एकात्मिक न्यायव्यवस्था

इतर तरतुदी -

कलम 355 अन्वये केंद्र शासनावर पुढील दोन कर्तव्ये टाकण्यात आलेली आहेत.

1. प्रत्येक राज्याचे बाह्य आक्रमण आणि अंतर्गत व शांतता यापासून संरक्षण करणे.

2. प्रत्येक राज्याचे प्रशासन घटनात्मक तरतुदींना अनुसरूनच असल्याचे सुनिश्चित करणे.

**निष्कर्ष :- ( Conclusion.)**

केंद्र-राज्य संबंध हा विषय घटना समितीमध्ये व स्वातंत्र्योत्तर काळात सर्वात जास्त चर्चेला गेलेला विषय आहे. घटनाकारांना जे अपेक्षित होते त्यांच्या नेमकी विरुद्ध घडल्यामुळे हा विषय अधिकच चर्चेचा विषय झाला. नव्याने केंद्र राज्य संबंधावर प्रकाश टाकण्यासाठी व वर्तमान परिस्थितीत संविधानात काय बदल करावेत हे सुचवण्यासाठी वेळोवेळी केंद्र शासनाने आयोग नेमून त्यांच्या शिफारशी विचारात घेतल्या आहेत, परंतु हव्या त्या प्रमाणात वर्तमान काळातही केंद्र राज्य संबंधात समन्वय आढळून येत नाही. घटनाकारांनी राज्यांच्या स्वायत्ततेसाठी चर्चा केली, परंतु घटनेमध्ये त्याची तरतूद करण्यात आली नाही. केंद्राची हुकूमशाही राज्यांवर लादली जाते. त्याचे उदाहरण म्हणजे सध्याचे जीएसटी कायदा. घटनेमध्ये सुद्धा केंद्र- राज्य अधिकाराबाबत विचार केल्यास केंद्राकडे झुकते मापदंड आहे हे आपले गृहीत करते सत्य ठरते.

**संदर्भ ग्रंथ सूची :- ( References )**

1. भारताची राज्यघटना आणि प्रशासन - रंजन कोलंबे, भगीरथ प्रकाशन, पुणे. ( विशेषतः)

2. भारतीय संविधान शासन व राजकीय प्रक्रिया - डॉ. बी. वाय. कुलकर्णी, एज्युकेशनल पब्लिशर्स

3. इंडियन पॉलिटी - एम. लक्ष्मीकांत, अनुवादक - श्रीकांत गोखले, संस्करण - संपादन, के सागर पब्लिकेशन्स.

4. आयोगाचा केंद्र - राज्य संबंधाबाबत अहवाल. भाग 1 (भारत सरकार 1988) पृष्ठे 28-29.

5. कॉन्स्टिट्यूमेंट असेंबली डिबेट्स, खंड 7, पृष्ठे 41 - 45.